# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९

जा.क्र./मनपा/उदयान/मिरारोड/३७६ /२०२५-२६

दिनांक: ०८/०७/२०२५

प्रति,
जनसंपर्क अधिकारी,
जनसंपर्क विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :- स्थानिक वर्तमानपत्रात जाहिर नोटीस सुचना प्रसिध्द करणेबाबत.**

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाची सोबत जोडलेली जाहिरात नोटीस सुचना स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

सदर नोटीस वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन त्याची प्रत उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागास उपलब्ध करुन देण्यात यावी.

सोबत :- जाहिर नोटीस प्रत.

(नागेश विरकर)
वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९

दिनांकः ०८/०७/२०२५

जा.क्र./मनपा/उद्यान/मिरारोड/३७६ /२०२५-२६

### // जाहीर नोटिस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊनअधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, प्रत्यक्ष पाहणी केली असता झाडे काढणे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | ठिकाण | वृक्षाचे नाव | संख्या | अदांजे वय | मुळासहित काढणे/ पुर्न:रोपण करणे | तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | भाईंदर (प.) जेनोफ़िल पॅलेस, गावदेवी रोड, कस्तुरी हॉस्पिटल जवळ येथिल श्री.ब्रायन जेरोम रॉड्रिक्स यांच्या इमारतीच्या आवारात ०१ नग नारळाचे झाड उंच वाढलेले असून झाडाचा वरिल भाग निमुळता होऊन धोकादायकरीत्या झाड झुकलेले आहे. जोराच्या वा-या पावसाने झाड बाजुच्या बिल्डींगच्या भिंतीवर पडुन जिवित व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरच्या झाडाची उंची पाहता सदरचे झाड पुर्नरोपण करणे शक्य नाही. या कारणास्तव सदरचे झाड मुळासकट काढणे आवश्यक आहे.**श्री. ब्रायन जेरोम रॉड्रिक्स यांचे दि.२४/०६/२०२५ रोजीचे प्राप्त पत्र** | नारळ | ०१ | २१ वर्ष | **मुळासहित काढणे** | धोकादायक |
| २ | मिरा रोड (पु) गोल्डन नेस्ट टाऊनशीप, फेस-३ येथील गोल्डन नेस्ट - ३ सोनम पॅरेडाईज को.ऑ.हौ.सो लि. येथील ०२ नग नारळाचे झाडे आहे. सदर झाडांची मुळे वर येऊन एकाबाजुस झुकलेले असुन सोसायटीमध्ये नागरीकांचा येजा असतो. तसेच गाडी खाली पार्कीग केलेली असतात. जोराच्या वाऱ्याने व पावसाने झाडे येणाऱ्या-जाणाऱ्या वर पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी या कारणास्तव सदरील झाड काढणे आवश्यक आहे. **गोल्डन नेस्ट -३ सोनम पॅरडाईज को.ऑ.हौ.सो.लि. यांचे दि.०४/०७/२०२५ रोजीचे पत्र..** | नारळ | ०१ | १२ वर्ष | | |
| ३ | मिरा रोड (पूर्व), शांतीपार्क येथील ग्रीन पार्क एव्हेन्यू जवळ असलेल्या सेंट झेवियर्स हायस्कूलमध्ये ०१ पिंपळाचे झाड आहे. सदरचे झाड शाळेच्या बस व्यवस्थापकांच्या खोलीच्या भिंतीवर आले असून, झाडाची मुळे भिंतीत पसरल्यामुळे भिंतीला तडा पडू शकेल. यामुळे भिंत पडण्याची शक्यता आहे. या कारणास्तव, हे झाड काढणे आवश्यक आहे. **सेंट झेवियर्स हाय स्कूल यांचे दि.३०/०६/२०२५ रोजीचे पत्र..** | पिंपळ | ०१ | ५ वर्ष | | |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिंकाच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (उद्यान विभाग), मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे garden@mbmc.gov.in या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

(नागेश विरकर)
वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका